पशुवसंवर्धन विभागाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माध्यम आराखडयास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

शासन निर्णय क्र.DAHD-१२०११/१/२०२६/DAHD-AH-२ (१६१८५३०)

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १८ ऑगस्ट, २०२६

वाचा:- १) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. राज्ययो- २०१२/प्र.क्र. ३०१/पदुम-४, दि. ३१.०१.२०१३

२) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्र. विस्तार/प्र.क्र.२६६/जाहिरात आराखडा/२२२८ /२०२६, पसं-१३, औंध, पुणे-७, दि. ०७.०४.२०२६

३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय , मंत्रालय,मुंबई यांचे क्र. वृत्तचित्र शाखा/का/७, दिनांक १६.०४.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना:-

राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या “मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना - राज्यस्तरीय योजना व जिल्हा वार्षिक योजना” शेतकरी, पशुपालक यांच्यापर्यत पोहचविणे तसेच, त्यांची प्रसिध्दी व प्रचार करणे या उद्देशाकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत जाहिरातीव्दारे प्रसार व प्रसिध्दी करुन प्रभावी अंमलबजावणी करण्याचे कार्य पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात येते. त्यानुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयामार्फत दिनांक ०७.०४.२०२६ च्या पत्रान्वये रु. ९९,२९,७००/- जाहिरातीच्या आराखडयाचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, शेतकरी, पशुपालक यांच्यापर्यंत पोहचविणे, अनुषंगिक प्रसिध्दी व प्रचार प्रभावीपणे करणे याकरिता जाहिरातीच्या जनजागृती करण्यासाठी रु. ८७,२९,१००/- (अक्षरी संत्यऐंशी लाख एकोणतीस हजार शंभर रुपये फक्त) इतक्या रकमेच्या जाहिरात माध्यम आराखडयास मान्यता दिली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १३.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय जाहिराती वितरण धोरणाच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार पशुसंवर्धन विभागाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दिनांक १६.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासन निर्णय पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये राज्यात पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, शेतकरी, पशुपालक यांच्यामार्फत पोहचविणे, अनुषंगिक प्रसिध्दी व प्रचार प्रभावीपणे करणे यासाठी जाहिरात व प्रसिध्दीच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहचविणे या उद्देशाकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दिनांक १६.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या माध्यम आराखडयास तसेच तो राबविण्यासाठी येणाऱ्या रु. ८७,२९,१००/- (अक्षरी संत्याऐंशी लाख एकोणतीस हजार शंभर रुपये फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. या प्रचार व प्रसिध्दी माध्यम आराखडयानुसार येणाऱ्या अंदाजीत खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे राहील:-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय								
पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांच्या व्यापक प्रसिद्धीकरिता प्रस्तावित अंदाजित माध्यम आराखडा								
अ क्र	माध्यम	स्वरुप	तपशील	रक्कम (प्रती नग)	संख्या	एकूण अंदाजित रक्कम	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)
१	निर्मिती साहित्य (Production of Creative)	**प्रिंट**	प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरिता जाहिरातीचा मजकूर (Adaptation, Translation, Formating from one media to other media)	१०,०००	१	१०,०००	१,८००	**११,८००**
		टिव्हीसी	TVC - १० ते ६० Sec. - As per DAVP rate	५७६,०००	०	-	-	-
		जिंगल्स/ स्पॉट	Audio Jingle (१० ते ६० Sec.) As per DAVP rate	४५,०००	१	४५,०००	८,१००	**५३,१००**
	Total A					**५५,०००**	**९,९००**	**६४,९००**
क् र.	Media	मूळ दर, प्रक्रिया	Details	वारंवारित ा	संख्या/ दिवस	एकूण अंदाजित रक्कम	जीएसटी	एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित)
	इलेक्ट्रॉनिक दृक-श्राव्ये माध्यम (वृत्तचित्र शाखा)							
१	आकाशवाणी केंद्र	केंद्र सरकार दर	जिंगल्स / स्पॉटचे सकाळी ७.१० आणि सायंकाळी ७ वाजता बातम्यांच्या मध्यंतरात एक वेळा (केंद्र शासनाचे दर)	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	७००,०००	१२६,०००	**८२६,०००**
२	राज्यातील एफ एम वाहिन्यावरुन (Private FM Radio Channels) जिंगल/ स्पॉटचे प्रसारण	CBC (DAVP) यादीवरील व दर	१० ते ६० सेकंदाच्या जाहिरातींचे राज्यातील प्रमुख स्टेशनवरुन प्रत्येक बँडमध्ये प्रस्तावित नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण (DAVP दर)	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	५००,०००	९०,०००	**५९०,०००**

	बाह्य माध्यमाद्वारे प्रसिद्धी (प्रदर्शने शाखा)							
१	राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (MSRTC) बसेसवरुन (३ पॅनेलवरुन साईड अँड बँक) योजनांची प्रसिद्धी	CBC (DAVP) यादीवरील व दर	As per DAVP - एकाधिकार उपलब्ध असलेल्या संस्थेकडून काम करुन घेण्याचे प्रस्तावित As per Availability	अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	३,९००,०००	७०२,०००	**४,६०२,०००**
	समाज माध्यमांद्वारे प्रसिद्धी							
१	सोशल मिडीया (Social Media)	विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे	शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित	नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत	३० दिवस	२,०००,०००	३६०,०००	**२,३६०,०००**
	Total - B					**७,१००,०००**		**८,३७८,०००**
	Total - A + B					**७,१५५,०००**		**८,४४२,९००**
१	शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) प्रमाणे	शासन निर्णय तरतुदीनुसार	माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टवेअर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च			२८६,२००		२८६,२००
	TOTAL EXPENDITURE (A + B)					**७,४४१,२००**		**८,७२९,१००**

२. सदर देयकांचा खर्च लेखशिर्ष मागणी क्र. डी ४ , २४०३ पशुसंवर्धन, (००) (१०) प्रदर्शन व प्रचार (१०० टक्के राज्य योजना) (कार्यक्रम), २६-जाहिरात व प्रसिध्दी (२४०३ ०८७५) या प्रसिध्दी व प्रचार या बाबीखाली सन २०२६-२७ करिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने यानुषंगाने संबधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याबाबत पुढील कार्यवाही करावी. तसेच सन २०२६-२७ मध्ये प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी सहआयुक्त (पशुधन व नियोजन), पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांना कार्यक्रमाचे कार्यान्वयन तसेच संनियंत्रण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुषंगाने विषयांकित देयके

आयुक्त पशुसंवर्धन यांच्या कार्यालयाकडे थेट सादर करण्यात यावीत. सहआयुक्त (पशुधन व नियोजन), पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांनी प्रस्तुत कार्यक्रम राबविण्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. प्रस्तुत प्रचार व प्रसिध्दी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करतांना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/आदेश/परिपत्रके यानुसार तसेच वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र. ३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित नियम पुस्तिका १९७८ मधील तरतूदींचे/ अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त नमूद देयकांबाबत कोणत्याही प्रकारचा विलंब न करता सदर देयके सन २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षांत देय होतील याची दक्षता घ्यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०८१८१५०४०७८५४५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2026.08.18 15:05:17 +05'30'

(नि. भा. मराळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, उप मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (गृह), महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, उप मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८. मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
९. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७
१०. महालेखापाल -१/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२. वरिष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, जि. पुणे.
१३. कक्ष अधिकारी/ अवर सचिव (पदु-१/३/४/१६), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (पदु-२)